नव राष्ट्र
पुणे, बुधवार, दि.२१ जुलै २०२१

कार्यक्रम **भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचा समारोप**

# संतांनी दिला लोकशाही, अंत्योदयाचा विचार

**पुणे**, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. "संत साहित्य हे जीवनदृष्टी देणारे आहे. शिक्षणाचा उद्देश हा माणूस घडविणारा आहे. संतांनी लोकशाही, समरसता आणि अंत्योदय हे अत्यंत महत्वाचे विचार दिले आहेत," असे मत इंडियन कॉन्सिल फॉर कल्चरल रिलेशन (आयसीसीआर)चे अध्यक्ष व खासदार डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांनी व्यक्त केले.



## दासबोध व्यवस्थापनशास्त्राचा उत्तम ग्रंथ

प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले,"संत साहित्याच्या माध्यमातून मानवाने जीवन कसे जगावे व कसे जगू नये याचा संदेश दिला आहे. भारतीय संतांनी धर्मशास्त्र आणि आध्यात्मशास्त्राचे ज्ञान संपूर्ण मानवजातीच्या उन्नती व कल्याणासाठी उपलब्ध करून दिले आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी हे विश्वची माझे घर हा संदेश जगाला दिला आहे. मन करारे प्रसन्न सर्व सिद्धीचे कारण असा संदेश देणाऱ्या संतांच्या विचारांचे अनुकरण केल्यावर आपले जीवन सुखमय होईल. दासबोध हा ग्रंथ व्यवस्थापनशास्त्राचा उत्तम ग्रंथ आहे. त्याचाही अभ्यास तरुण पिढीने करून जीवनाची वाटचाल करावी." प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. संजय उपाध्ये यांनी आभार मानले.

## डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचे मत

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे ते म्हणून बोलत होते. एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड हे अध्यक्षस्थानी होते.जगविख्यात संगणक तज्ज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर, खासदार स्वामी सुमेधानंद सरस्वती आणि खासदार महंत बालक नाथयोगी हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. ही परिषद एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून साकार झाली आहे. यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्र कुलगुरू डॉ. आर.एम.चिटणीस, परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष ह.भ.प. बापूसाहेब मोरे, रविदास महाराज शिरसाठ, डॉ. संजय उपाध्ये आदी उपस्थित होते.

> "संताच्या साहित्याची शिदोरी आणि विचार संचित हे समाजाला मिळालेली मोलाची देणगी आहे. संतांनी ग्रंथ, गीते, अभंग, काव्य लिहून त्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचे चिंतन समाजासमोर मांडले आहे. संतांचे विचार आणि साहित्य यांचा आजच्या शिक्षण पद्धतीत अंतर्भाव झाल्यास संस्कारित पिढी निर्माण होवून बलशाली भारत घडेल.
>
> -डॉ. विनय सहस्त्रबुद्धे, खासदार

> "सत्याची जाणीव करुण देणे म्हणजे शिक्षण आहे. मी कोण आहे हा विचार आध्यात्मात आहे. त्यामुळेच सत्य जाणण्यासाठी शिक्षणात संत साहित्याचा समावेश करावा. या सृष्टीवर हजारो संस्कृती आल्या आणि कालानुरूप त्या लोप पावल्या. परंतू भारतीय संस्कृती टिकून ती नव अवतरित झाली आहे. त्यात संत साहित्याचा समावेश होतो. परंपरा व संस्कृतीचा विचार केल्याशिवाय शिक्षण कधीही पूर्ण होवू शकणार नाही. संत साहित्य शाश्वत आहे.
>
> -डॉ. विजय भटकर,संगणक तज्ज्ञ

आज का आनंद
पुणे, बुधवार, दि.२१ जुलै २०२१

# संतों ने लोकतंत्र, समानता एवं अंत्योदय जैसे महत्वपूर्ण विचार दिए

## MIT के 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षा परिषद' के समापन समारोह में ICCR के अध्यक्ष डॉ. विनय सहस्त्रबुद्धे ने कहा

कोथरूड, 20 जुलाई (आ.प्र.)

'संत साहित्य जीवनदृष्टि देता है. संतों ने लोकतंत्र, समानता एवं अंत्योदय जैसे महत्वपूर्ण विचार दिए हैं.' यह राय इंडियन काउंसिल फॉर कल्चरल रिलेशन (आईसीसीआर) के अध्यक्ष सांसद डॉ. विनय सहस्त्रबुद्धे ने व्यक्त की. वे पहली 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षा परिषद' के समापन समारोह में मुख्य अतिथि के रूप में संबोधित कर रहे थे. एमआईटी वर्ल्डपीस यूनिवर्सिटी, पुणे एवं तीर्थक्षेत्र आलंदी-देहू परिसर विकास समिति, आलंदी के संयुक्त तत्वावधान में यूनिवर्सिटी के कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड़ के कॉन्सेप्ट पर यह आयोजन किया गया.

### परिषद में मंजूर किए गए महत्वपूर्ण प्रस्ताव

- *सरकार पाठ्यक्रमों के अलावा संत साहित्य परीक्षा भी आयोजित करे*
- *कॉलेजों में संत साहित्य अभ्यास अध्यासन की स्थापना अनिवार्य हो*
- *केंद्र सरकार साल में एक बार भारतीय संत साहित्य पर आधारित अंतर्राष्ट्रीय स्तर की परिषद का आयोजन करे*
- *यूनेस्को की तर्ज पर 'वेल्यू बेस्ड एजुकेशन सोशल कल्चरल ऑर्गेनाइजेशन' की स्थापना हो*
- *सीबीएसई के देशभर के स्कूलों में संबंधित राज्यों के सभी संतों का संयुक्त भव्य स्मारक व लाइब्रेरी का निर्माण हो*
- *आईआईटी की तर्ज पर इंडियन इंस्टीट्यूट ऑफ नॉलेज डिवाइन (आईआईकेडी) की स्थापना हो*

कम्प्यूटर विशेषज्ञ डॉ. विजय भटकर ने कहा- 'जो सत्य से परिचित कराए, वो ही शिक्षा है. मैं कौन हूं? यह सवाल अध्यात्म में उठाया गया है. इसे दृष्टि में रखते हुए सत्य से परिचित कराने हेतु शिक्षा में संत साहित्य का समावेश होना चाहिए.'

सांसद स्वामी सुमेधानंद सरस्वती ने कहा- 'भारतीय शिक्षा पद्धति को समृद्ध करने हेतु उसमें संत साहित्य का समावेश करना जरूरी है. अध्यात्म के माध्यम से मन, बुद्धि एवं विचारों को स्थिर किया जाता है.'

एमआईटी डब्ल्यूपीयू के संस्थापक अध्यक्ष प्रो. डॉ. विश्वनाथ कराड़ ने कहा- 'संत साहित्य के माध्यम से जीवन को किस तरह जीएं व किस तरह नहीं? इस विषय में संदेश दिया गया है. भारतीय संतों ने धर्मशास्त्र एवं अध्यात्मशास्त्र का ज्ञान पूर्ण मानवजाति की उन्नति व कल्याण के लिए उपलब्ध कराया है.'

कार्यक्रम में सांसद महंत बालनाथयोगी, रविदास महाराज शिरसाठ एवं बापूसाहेब मोरे ने भी विचार व्यक्त किए. सूत्र संचालन प्रो. गौतम बापट तथा आभार प्रदर्शन डॉ. संजय उपाध्ये ने किया.

तरुण भारत
सोलापूर, बुधवार, दि.२१ जुलै २०२१

# संतांनी दिला लोकशाही, समरसता अन् अंत्योदयाचा विचार

## डॉ. विनय सहस्रबुद्धे यांचे मत; 'एमआयटी डब्ल्यूपीयू'त भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदेचा समारोप

तभा वृत्तसेवा,
पंढरपूर, दि. २० जुलै -



संत साहित्य हे जीवनदृष्टी देणारे आहे. शिक्षणाचा उद्देश हा माणूस घडविणारा आहे. संतांनी लोकशाही, समरसता आणि अंत्योदय हे अत्यंत महत्त्वाचे विचार दिले आहेत, असे मत इंडियन कौन्सिल फॉर कल्चरल रिलेशन (आयसीसीआर)चे अध्यक्ष व खासदार डॉ. विनय सहस्रबुद्धे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पहिल्या 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे'च्या समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड अध्यक्षस्थानी होते. संगणकतज्ञ पद्मभूषण डॉ. विजय भटकर, खासदार स्वामी सुमेधानंद सरस्वती आणि खासदार महंत बालक नाथयोगी हे विशेष सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. ही परिषद एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष राहुल विश्वनाथ कराड यांच्या संकल्पनेतून साकार झाली आहे.

डॉ. विजय भटकर म्हणाले, सत्याची जाणीव करुन देणे म्हणजे शिक्षण आहे. मी कोण आहे हा विचार आध्यात्मात आहे. त्यामुळेच सत्य जाणण्यासाठी शिक्षणात संत साहित्याचा समावेश करावा. या सृष्टीवर हजारो संस्कृती आल्या आणि कालानुरूप त्या लोप पावल्या. परंतू भारतीय संस्कृती टिकून ती नव अवतरित झाली आहे. त्यात संत साहित्याचा समावेश होतो. संत साहित्य शाश्वत आहे.

यावेळी एमआयटी डब्ल्यूपीयूचे प्र कुलगुरू डॉ. मिलिंद पांडे, प्र कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, परिषदेच्या संयोजन समितीचे अध्यक्ष ह.भ.प. श्री. बापूसाहेब मोरे, कार्याध्यक्ष ह.भ.प. श्री. रविदास महाराज शिरसाट आणि समन्वयक डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते.

डॉ. विनय सहस्रबुद्धे म्हणाले, संत ज्ञानेश्वरांनी 'जो, जे वांछिल तो ते लाहो। प्राणिजात' हा विचार आजच्या काळात लोकशाही या अर्थात लागतो. त्यानंतर समाजाची मनोभूमिका बनविण्यासाठी त्यांनी समरसतेचा विचार मांडला. पुढे चालून हाच विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मांडला. उपेक्षित घटकांना न्याय मिळावा यासाठी संतांनी अंत्योदयाचा विचारही ठेवला. महात्मा गांधी यांनी ही अंत्योदयाच्या विचाराला खूप महत्त्व दिले आहे. संतांचे विचार हे आधुनिक काळाशी जोडले तर ते मनुष्य घडविणारे आहे.

संतांच्या साहित्याची शिदोरी आणि विचार संचित हे समाजाला मिळालेली मोलाची देणगी आहे. संतांनी ग्रंथ, गीते, अभंग, काव्य लिहून त्यातून व्यक्तिगत आणि सामाजिक जीवनाचे चिंतन सम्यक गांभीर्याने मांडले आहे ... विचार आणि ... आजच्या शिक्षण ... झाल्यास संस्कारित पिढी निर्माण होऊन बलशाली भारत घडेल.

स्वामी सुमेधानंद सरस्वती म्हणाले, भारतीय शिक्षण पद्धतीला समृद्ध करण्यासाठी संत साहित्य अत्यंत महत्त्वाचे आहे. स्वामी विवेकानंद सांगतात की मनुष्य हा आईच्या मांडीत, वडिलांच्या सानिध्यात, घराच्या अंगणात, गावातील गल्ली बोळात आणि विद्यालयात परिपूर्ण तयार होतो, परंतू आजच्या काळात याचा अभाव दिसून येतो. आत्मिक सुख हे केवळ आध्यात्म... ...ळते, आध्यात्म... ...द्धि आणि ...

जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.

**देशोन्नती**

**वाशिम, बुधवार, दि.२१ जुलै २०२१**

# सात्विक आहाराने आत्मोन्नती होते

## डॉ. बालाजी तांबे यांचे प्रतिपादन

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मंगरूळपीर ■** जगद्गुरू तुकाराम महाराज सांगतात की, स्वकष्टातून खाल्लेले अन्न हे शरीरासाठी योग्य आहे. अन्नाचा संबंध हा मन आणि मेंदू यांच्याशी आहे. पवित्र जागेत परमेश ?वराच्या नामस्मरणाने भोजन केल्यास आत्मोन्नती होते. एकंदरीतच संतांनी आरोग्यासंदर्भात जे काही सांगितले त्याचे पालन केले तर सर्वांना सुख व शांती मिळेल.असे विचार आत्मसंतुलन व्हिलेजचे संस्थापक डॉ. बालाजी तांबे यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे आणि श्रीक्षेत्र आळंदी-देहू परिसर विकास समिती, आळंदी, यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'भारतीय संतसाहित्य उच्चशिक्षण परिषदे' च्या तिसऱ्या दिवसाच्या 'संत आणि आरोग्य व्यवस्थापन' या विषयावरील चौथ्या सत्रात प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्रसिद्ध नेत्ररोग तज्ज पद्मश्री डॉ. तात्याराव लहाने हे होते. यावेळी संत भगवानबाबा वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प. अर्जुन महाराज लाड, सुप्रसिद्ध कीर्तनकार ह.भ.प. मुकुंद महाराज जाटदेवळेकर, ह.भ.प. बाळासाहेब बडवे, संत साहित्याचे अभ्यासक ह.भ.प. ज्ञानेश ?वर महाराज माळी आणि सुप्रसिद्ध डॉक्टर विश ?वास सापत्नेकर हे सन्माननीय वक्ते म्हणून उपस्थित होते.तसेच, एमआयटी डब्ल्यूपीयूचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश ?वनाथ दा. कराड आणि डॉ. संजय उपाध्ये हे उपस्थित होते. डॉ. बालाजी तांबे म्हणाले, समर्थ रामदास स्वामी यांनी अन्नाला पूर्ण ब्रह्म असे संबोधले आहे. वदनी कवळ घेता नाम घ्या श्रीहरीचे हा श्लोक म्हणून अन्नाचे सेवन केल्यास आपले जीवन निरोगी राहण्यास मदत होईल. त्यामुळे मेंदूत सकारात्मक भाव निर्माण होतात. तामसी अन्न हे सदैव रोग निर्मिती करतात. संतांनी उपवासाला ही महत्व दिले आहे. त्याचे कारण म्हणजे याकाळात आपली शक्ती परेश ?वराचे चिंतन करण्यासाठी लावावी. यामुळे



शरीरातील विषाण्य नष्ट होतात. संतांच्या वाङ्मयाचे अध्ययन केल्यास असे दिसते की मानवाचे आरोग्य उत्तम राहिल्यास हे जग नीट चालेल, सुव्यवस्था निर्माण होईल आणि मनुष्य हा मनुष्याचा आदर करेल. चांगले कर्म झाले तरच आत्मोन्नती होईल.डॉ. तात्याराव लहाने म्हणाले, उत्तम आरोग्यसाठी शुद्ध शाकाहार, व्यायाम, संतुष्टता, योग्य निद्रा, सहनशक्ती आणि चिंतामुक्त जीवन असावे. शुद्ध शाकाहार म्हणजे सात्त्विक अन्न जे शरीराबरोबरच मानसिक आरोग्य चांगले ठेवते. शारीरिक कष्ट व भरपूर व्यायाम केल्यानेही मन व शरीर मजबूत होते. जीवनात अल्प संतुष्टता असल्याने दुःख कधीही मिळणार नाही. तसेच शारीरिक झीज भरून काढण्यासाठी ८ तास झोप घ्यावी. तसेच चिंतामुक्त जीवन हेच खरे जीवन आहे. या सर्व गोष्टींवर संतांनी आपल्या साहित्यात नोंद करून ठेवले आहे.डॉ. विश ?वास सापत्नेकर म्हणाले, संतांनी मानव सेवेची शिकवण दिली आहे. याचे पालन करून पंढरपुरच्या वारीला जाणाऱ्या वारकऱ्याची वैद्यकीय सेवा करण्याचे भाग्य मला लाभले. सेवेमुळे मनाला सदैव प्रसन्नता मिळते. आज वारीमुळेच संपूर्ण वर्षभर सत्कर्म करण्याचे बळ मिळते. सेवेसाठी एक ट्रस्ट तयार करून ५० डॉक्टरांची टीम केली आहे. त्यांच्या माध्यमातून प्रत्येक वर्षी वारकऱ्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभते.अर्जुन महाराज लाड म्हणाले, जे सर्व स्थितीत संतुष्ट असतात त्यांना संत असे म्हणतात. या संतांनीच मनाची जोपासना केली आहे. सर्व रोग हे मनातून निर्मित होते. वास्तविक शरीर रोगाचे भांडार आहे पण मन प्रसन्न असेल तर कोणत्याही रोगाचा परिणाम शरीरावर होणार नाही.तुकोबां ही म्हणतात मन प्रसन्न हे आरोग्याची गुरूकिल्ली आहे. औषधापेक्षा पथ्ये महत्वाचे आहे. संत साहित्यातून आरोग्य, विज्ञान, भौतिक व्यवहार आणि मानवाच्या जीवनातील सर्व घटकांचे विषय मांडून त्यांनी मार्गदर्शन केले आहे.मुकुंद महाराज जाटदेवळेकर म्हणाले, संत साहित्य आणि आरोग्य यांचा जवळीक संबध आहे. संतांनी केलेला उपदेश हा मानव कल्याणासाठीच असतो. त्यांची शिकवण ही संयमाची आहे. शरीर चांगले तर सर्व गोष्टींचा उपभोग घेऊ शकतो. त्यासाठी आरोग्य उत्तम ठेवावे. यासाठी कष्ट करून त्यावर संस्कार करावे.प्रा.डॉ. विश्वनाथ दा कराड म्हणाले,भारतीय संस्कृती, तत्वज्ञान आणि प्राणीमात्रांचा विचार आमच्या संतांनी केला आहे. संतांनी मानवी कल्याणासाठी जे तत्त्वज्ञान सांगितले, त्याचे अनुकरण केल्यास संपूर्ण मानव जातीला सुख-समाधान आणि शांती मिळेल. त्याचबरोबर त्यांनी मनाच्या शास्त्राचे रहस्यही संपूर्ण मानवजातीसमोर मांडले.बाळासाहेब बडवे म्हणाले, शरीराच्या आरोग्याला खूप महत्त्व आहे. शरीर रोगी असेल तर त्यातील प्राण ज्योतीलापण वेदना होतात. त्यामुळे मानवाची ग्रहण शक्ती क्षीण झाली आहे. अशा वेळेस संतांच्या विचारांचे संस्कार धारण करावे. उत्तम आरोग्य म्हणजे मन व बुद्धि संयमित ठेवणे आहे. शरीराबरोबरच मनाचे आरोग्य ठेवण्यासाठी ध्यान साधना करावी.ह.भ.प. ज्ञानेश ?वर महाराज माळी म्हणाले,संत साहित्याचा अभ्यास करतांना दिसते की त्यांचा आयुर्वेदाशी मेळ आहे. वारीला जातांना विठ्ठलाचा जो गजर केल्या जातो, त्यामुळे शरीरात स्पंदने तयार होवून ह्याचे आजार कमी होतांना दिसतात. तसेच, शुध्द बीजा पोटी फळे रसाळ गोमटी ही ओवी सांगून जाते की गर्भसंस्कार करतांना कसे संस्कार केले गेले पाहिजे. या वरून समजते की संत हे स्त्री रोग तज्ञ ही होते.डॉ. शैलश्री हरिदास यांनी स्वागतपर भाषण केले. महेश महाराज नलावडे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. रोहिणी काळे यांनी आभार मानले.(ता.प्र.)

**जनसंपर्क विभाग, माईर्स एमआयटी, पुणे.**